# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः06.05.2024** **वारःसोमवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याचा प्रचार संपला; राज्यातील 11 मतदारसंघात उद्या मतदान
2. अखेरच्या दिवशी सर्वच पक्षांच्या नेत्यांकडून जोरदार प्रचार
3. लोकसभा निवडणूक प्रक्रियेच्या निरीक्षणासाठी तेवीस देशांचे प्रतिनिधी भारत भेटीवर
4. महिलांच्या 20 षटक-विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचं ऑक्टोबरमध्ये बांग्लादेशात आयोजन आणि
5. राज्यात उष्णतेचा कहर, अनेक जिल्ह्यांमध्ये पारा 43 अंशांवर

**प्रचार संपला-कोल्हापूर, सांगली, सोलापूर**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याच्या प्रचारतोफा काल थंडावल्या. या टप्प्यात राज्यातील रायगड, बारामती, धाराशिव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर, आणि हातकणंगले या 11 लोकसभा मतदार संघांमध्ये उद्या, 7 मे रोजी मतदान होणार आहे. या तिसऱ्या टप्प्याच्या प्रचारात महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांसह सर्वच पक्षांच्या नेत्यांच्या झंजावाती प्रचारसभा, पदयात्रा, गाठी-भेटी आणि बैठकांनी राज्यातलं वातावरण ढवळून निघालं होतं.

कोल्हापूर लोकसभा मतदारसंघात संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ महायुतीकडून काल प्रचार फेरीचं आयोजन करण्यात आलं होतं. शहरातील दसरा चौक ते शिवाजी चौक अशी ही फेरी काढण्यात आली. संजय मंडलिकांना दिल्लीत पाठवून कोल्हापूरकर मोदींचे हात बळकट करणार असल्याचा विश्वास शिवसेना नेते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला. पंतप्रधान मोदींची दहा वर्ष आणि महायुतीची दोन वर्ष लोकांसमोर आहेत. या कामाची पोचपावती कोल्हापुरात मिळाली असून आमचा विजय निश्चित असल्याचं ते म्हणाले.

बारामती लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी काल राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी इंदापूर इथं जाहीर सभा घेत प्रचाराची सांगता केली. तर महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांच्या प्रचारासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी काल बारामतीमध्ये जाहीर सभा घेऊन प्रचाराची सांगता केली.

माढा मतदारसंघातले उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारासाठी ज्येष्ठ भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी टेंभुर्णे इथं सभा घेतली, तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फलटण इथं सभा घेतली. फडणवीस यांनी पंढरपूर इथंही महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांच्यासाठी प्रचार सभा घेतली.

पाणी, वीज, रस्ते आणि इतर वाहतूक सुविधा तसच संपर्क यंत्रणा या चार गोष्टी ज्या ठिकाणी विकसित होतात, त्या ठिकाणी व्यापार उद्योग आणि शेतीचा विकास होतो, असं मत नितीन गडकरी यांनी काल सांगली इथं व्यक्त केलं. सांगली लोकसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टी - महायुतीचे उमेदवार संजय पाटील यांच्या प्रचारार्थ मिरज इथं विकसित भारत@2047 या संवाद मेळाव्यात गडकरी बोलत होते. या मेळाव्यात डॉक्टर, व्यापारी, उद्योजक सहभागी झाले होते.

सांगली लोकसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार विशाल पाटील यांच्या प्रचारार्थ काल मिरजेत वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर यांनी सभा घेतली. यावेळी त्यांनी भाजपवर जोरदार टीका केली. भाजपाप्रणित सरकार सत्तेत आल्यानंतर, 50 कोटीपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या 17 लाख कुटुंबांनी भारत देश सोडला आणि देशाचं नागरिकत्वदेखील सोडलं, असं का झालं ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सांगलीमध्ये काल महाविकास आघाडीचे चंद्रहार पाटील यांच्या प्रचारार्थ आमदार आदित्य ठाकरे यांची सभा झाली. भारतीय जनता पार्टीला संविधान बदलायचं आहे, त्यासाठी ते 400 जागांची घोषणा देत आहेत असा आरोप त्यांनी यावेळी केला.

दरम्यान लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या आणि पाचव्या टप्प्यासाठीचा प्रचारही आता शिगेला पोहोचला आहे. काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी काल पुण्यात पत्रकार परिषद घेतली. पुणे शहराला अमली पदार्थांच्या विळख्यातून मुक्त करण्याचा निर्धार इंडि आघाडीने केला आहे, अस वडेट्टीवार यांनी सांगितलं. महविकास आघाडीचे काँग्रेसचे पुणे लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारासाठी आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

**बारामती**

पुणे जिल्ह्यात तिसऱ्या टप्प्यात बारामती लोकसभा मतदासंघात उद्या 7 मे रोजी मतदान होत असून मतदानाच्या दृष्टीने सर्व तयारी पूर्ण झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी कविता द्विवेदी यांनी दिली आहे, वाढतं तापमान लक्षात घेता बारामती लोकसभा मतदार संघात निवडणुकीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी तसच मतदारांसाठी 1724 प्रथमोपचार पेट्या आणि प्रत्येक मतदान केंद्रासाठी 10 ओआरएसच्या पाकिटांचे वितरण काल पुण्याच्या कृषी महाविद्यालयातील वितरण केंद्रातून करण्यात आले.

**अधिसूचना**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यासाठी आज अधिसूचना काढली जाणार आहे. सात राज्यं आणि एक केंद्रशासित प्रदेशातील मिळून 57 लोकसभा जागांसाठी ही निवडणूक होणार आहे.

**आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी**

देशात सध्या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकांची प्रक्रिया जवळून पाहण्यासाठी तेवीस देशांच्या निवडणूक व्यवस्थापन मंडळांचे आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी भारत भेटीवर आले आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी काल या पंचाहत्तर आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींना जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीतल्या निवडणुकीच्या विविध पैलूंची माहिती दिली. हे प्रतिनिधी महाराष्ट्र, गोवा, गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश या सहा राज्यांना भेटी देऊन विविध मतदारसंघातील निवडणुक प्रक्रियेचं निरीक्षण करणार आहेत. नऊ मे रोजी या उपक्रमाची सांगता होणार आहे.

**भाजपा तक्रार-मुंबई**

भारतीय जनता पार्टीने प्रचारासाठी आघाडीच्या वर्तमानपत्रात काल प्रकाशित केलेली जाहिरात मतांचं ध्रुवीकरण करणारी असल्याची तक्रार काँग्रेसनं केली आहे. प्रदेश काँग्रेसच्या शिष्टमंडळानं काल राज्याच्या अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेतली. निवडणूक आयोगानं याची गंभीर दखल घेऊन भाजपासह महायुतीच्या उमेदवारांची उमेदवारी रद्द करून त्यांच्यावर आचारसंहिता भंगाचे गुन्हे दाखल करावेत अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

**गृह मतदान-सिंधुदुर्ग, कोल्हापूर, रत्नागिरी**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेल्या चार दिवसात 85 वर्षांवरचे वृद्ध मतदार, दिव्यांग व्यक्ती आणि अत्यावश्यक सुविधा देणारे अधिकारी कर्मचारी मिळून आतापर्यंत 4 हजार 72 जणांनी मतपत्रिकेद्वारे गृह मतदान केलं आहे, अशी माहिती निवडणूक विभागाकडून देण्यात आली. कोल्हापूर लोकसभा मतदार संघातील 2 हजार 751 तर हातकणंगले लोकसभा मतदार संघातील 959 ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदारांनी गृह मतदान करत आपला मतदानाचा हक्क बजाविला. दरम्यान, रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा

मतदारसंघात तिसऱ्या टप्प्यात उद्या, सात मे रोजी मतदान होणार असून, मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा आणि मतदान सुरळीतपणे पार पडावं, यासाठी  या दिवशी रत्नागिरी जिल्ह्यातले सर्व आठवडा बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांनी दिले आहेत.

**चंदन जप्त- बीड**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, काल बीड जिल्ह्यातल्या केज पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये दोन कोटी रुपये किंमतीचं चंदन जप्त करण्यात आलं आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखा आणि केज पोलिसांच्या वतीनं करण्यात आली. 1200 किलो चंदन जप्त करण्यात आल असून दोघांना ताब्यात घेण्यात आल आहे.

**शरण**

छत्तीसगडमधल्या दंतेवाडा जिल्ह्यात काल 35 नक्षलवादी पोलिसांना शरण आले. यातील तीन नक्षलवाद्यांवर बक्षीस घोषित करण्यात आलं होतं.

**अपघात-बुलढाणा, नांदेड**

बुलढाणा जिल्ह्यामध्ये मेहकर नजीक समृद्धी महामार्गावर काल एका मोटारीला मागून एका वाहनाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात 2 जणांचा मृत्यू झाला. यातील जखमींना छत्रपती संभाजी नगर  इथल्या रुग्णालयात सखल करण्यात आलं आहे. नांदेड जिल्ह्यात झालेल्या दुसऱ्या एका अपघातात काल मुदखेड तालुक्यातील पारडी येथून देगलूर तालुक्यातील शहापूर इथ लग्नाच वऱ्हाड घेऊन जात असलेला टेम्पो उलटल्यान 15 वऱ्हाडी जखमी झाले. यात चौघांची प्रकृती गंभीर आहे. जखमींना नायगाव इथल्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आल आहे.

**निधन**

मराठी नाट्य-चित्रपट अभिनेते, लेखक आणि दिग्दर्शक क्षितीज झारापकर यांचं काल मुंबईत  निधन झालं. ते 54 वर्षांचे होते. क्षितीज झारापकर यांनी गोळाबेरीज, ठेंगा, एकुलती एक, आयडियाची कल्पना आदी चित्रपटांतून भूमिका केल्या. तसच त्यांनी विविध चित्रपट आणि नाटकांचं दिग्दर्शन आणि लेखनही केलं होत.

**क्रिकेट**

महिलांच्या 20 षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचा कार्यक्रम आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटनेनं काल जाहीर केला. येत्या 3 ते 20 ऑक्टोबर या कालावधीत बांग्लादेशमध्ये ही स्पर्धा होईल. या स्पर्धेत 10 देशांचे संघ सहभागी होत आहेत. भारताचा समावेश अ गटात असून भारताचा सलामीचा सामना 4 ऑक्टोबरला सिल्हेत इथं न्यूझीलंडसोबत होणार आहे.

**हवामान**

महाराष्ट्राच्या अनेक जिल्हयांमध्ये उष्णतेची प्रचंड लाट सुरु आहे. त्यामुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झालं आहे. सोलापूर जिल्ह्यात जेऊर इथं सर्वाधिक 44 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. राज्यात काल जळगाव इथं 42 पूर्णांक 3 अंश, सांगली 41 पूर्णांक 6, सातारा 40 पूर्णांक 9, सोलापूर 43 पूर्णांक 4, औरंगाबाद 41 पूर्णांक 6, नांदेड 43 पूर्णांक 2, धाराशिव 42, परभणी 43 पूर्णांक 6, अकोला 44 पूर्णांक 3, अमरावती 43 पूर्णांक 8, ब्रह्मपुरी 43 पूर्णांक 7, बुलढाणा 40, चंद्रपूर 43 पूर्णांक 8, नागपुर 41 पूर्णांक 5, वर्धा 43, आणि यवतमाळ इथं 42 पूर्णांक 2 अंश सेल्सियस कमाल तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात आज तुरळक ठिकाणी वीजा आणि जोराचे वारे यांच्यासह पावसाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार